महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर
दिवाणजी कॉम्प्लेक्स,दुसरा मजला ,अंबाजोगाई रोड, लातूर-४१३५१२
E-mail :supdtest.la-mh@gov.in दुरध्वनी क्रमांक-०२३८२ -२२७०५५
www.charity.maharashtra.gov.in

जा.क्र.मालमत्ता/निर्लेखन/विक्री/जाहीरात-१/४७०/२०२६ दिनांक :-२३/०१/२०२६

प्रति,
मा.धर्मादाय आयुक्त सो,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषय: धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करणे बाबत..

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर या कार्यालयातील जुने झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन व प्रिंटर यांचे निर्लेखन करुन विक्री करावयाची आहेत. त्याकरीता यासोबत जोडण्यात आलेली निविदा सूचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
23.1.26
(राजेश अ.सासने)
धर्मादाय सह आयुक्त,
लातूर विभाग, लातूर

सोबत: निविदा सूचना.

प्रत: आदेशिकावाहक- कार्यालयीन नोटीस बोर्डवर डकविणे करीता.

महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर
दिवाणजी कॉम्प्लेक्स,दुसरा मजला ,अंबाजोगाई रोड, लातूर-४१३५१२
E-mail :supdtest.la-mh@gov.in दुरध्वनी क्रमांक-०२३८२ -२२७०५५
www.charity.maharashtra.gov.in



जा.क्र.मालमत्ता/निर्लेखन/विक्री/जाहीरात-१/ ५०९/२०२६ दिनांक :-२३ /०१/२०२६

## *निविदा सूचना*
## *(निविदा क्र.०१/२०२६)*

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर या कार्यालयातील खालील नमूद झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन व प्रिंटर या उपकरणांची विक्री करावयाची आहे. त्याकरीता इच्छुक खरेदीदारांकडून निविदा/दरपत्रके ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. इच्छुक खरेदीदारांना सदर उपकरणे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर येथे खालील नमुद पत्त्यावर **दिनांक ०२.०२.२०२६ ते दिनांक ११.०२.२०२६** या कालावधीत **सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत** पाहता येतील.

| अ.क्र. | उपकरणाचे नाव व खरेदी वर्ष | मुळ किंमत | एकुण संख्या |
|---|---|---|---|
| १ | पॅनोसॉनिक झेरॉक्स मशिन (DP८०२०E) (खरेदी सन २००९) | रुपये ४,३६,२६५/- | १ |
| २ | RISO RZ-२२०AS झेरॉक्स मशिन (खरेदी सन २००९) | रुपये २,६३,०१०.८१/- | १ |
| ३ | पॅनोसॉनिक लेझर फॅक्स मशिन (KX-MB२८००L) (खरेदी सन २०१२) | रुपये १५,४७६.१९/- | १ |
| ४ | कॅनॉन नेटवर्क प्रिंटर (Cannon IR२८२२L) (खरेदी सन २०१२) | रुपये ५८,३६८/- | १ |

तरी इच्छुक खरेदीदारांनी खालील नमुद अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमुद कालावधी व वेळेमध्येच सिलबंद दरपत्रके या कार्यालयास सादर करावीत. तसेच दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर " **झेरॉक्स, फॅक्स व प्रिंटर खरेदीचे दरपत्रक** " असे नमुद करुन "**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, अंबाजोगाई रोड, लातूर -४१३५१२**" या पत्त्यावर पाठवावे.

(राजेश अ.सासने)
धर्मादाय सह आयुक्त,
लातूर विभाग, लातूर

**नियम व अटी:-**

१) इच्छुक खरेदीदाराने वर नमुद उपकरणांपैकी त्यांना जे उपकरण खरेदी करावयाचे आहे, त्या उपकरणांचा दर स्वतंत्रपणे दरपत्रकात नमूद करणे आवश्यक राहील. तसेच इच्छुक खरेदीदाराने दरपत्रकासोबत आधारकार्ड / पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) दिलेल्या मुदतीनंतर दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

३) दरपत्रक मान्य / अमान्य अथवा पुर्णपणे रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

४) अधिकतम दर असलेले दरपत्रक स्विकृत करण्यात येईल. अधिकतम दर असलेले दरपत्रक सादर करणाऱ्या खरेदीदारास त्याबाबत कळविण्यात आल्यानंतर संबंधितांनी पुढील ०५ दिवसाचे आत (सुट्टीचे दिवस वगळून) आपल्या दरपत्रकातील नमुद खरेदी रक्कमेचा भरणा या कार्यालयाच्या सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत करुन त्याची प्रत अधीक्षक (मालमत्ता) यांचेकडे सादर करावी. त्यानंतरच खरेदी केलेले उपकरण (झेरॉक्स मशिन/फॅक्स मशिन/प्रिंटर इत्यादी) घेवुन जाणेस परवानगी देण्यात येईल.

५) मुद्दा क्र.४ प्रमाणे खरेदीदारास उपकरण खरेदीची रक्कम भरणेबाबत अवगत केलेनंतर मुदतीत रक्कम न भरल्यास देण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील.

६) मुद्दा क्र.४ ची पुर्तता केल्यानंतर खरेदी केलेले उपकरण ०७ दिवसाचे आत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. तद्नंतर प्रति दिन रुपये १००/- दंड आकारण्यात येईल. १० दिवसाचे आत उपकरणे ताब्यात न घेतल्यास मान्य दरपत्रक रद्द करण्यात येईल व जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.

७) खरेदीदारास खरेदी रकमेवर नियमाप्रमाणे सर्वप्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यातून कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

८) विक्री मुल्यावर नियमानुसार सेवा व वस्तु कर (जीएसटी) भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

९) खरेदी केलेली उपकरणे स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर घेवुन जावी लागेल. त्याकरीता वाहतुक खर्च वा अन्य रक्कम कार्यालयाकडून उपलब्ध केली जाणार नाही. तसेच सदरची उपकरणे ज्या स्थितीत ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणाहुन ताब्यात देण्यात येईल.

१०) खरेदी प्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे क्षेत्र लातूर येथे राहील.